# पोटातील जीवाणूंमुळे अल्झायमरचा धोका

आरोग्य वार्ता




**वॉशिंग्टन :** पोटातील आतड्यांमध्ये असलेल्या जीवाणूंमुळे अल्झायमर रोगाचा धोका वाढू शकतो, असे नव्या संशोधनातून सिद्ध झाले आहे. हेलिकोबॅक्टर पायलोरी संसर्गामुळे ५० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींमध्ये अल्झायमर रोगाचा धोका वाढतो का हे या अभ्यासात तपासण्यात आले. आतड्यातील जीवाणूमुळे पोटाचा कर्करोग, जठराची सूज, अपचन यांबरोबरच अल्सर हा आजार होऊ शकतो, या संशोधकांनी सांगितले. 'अल्झायमर आणि डिमेंशिया : द जर्नल ऑफ द अल्झायमर असोसिएशन'मध्ये या संशोधनासंबंधी अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. मॅकगिल विद्यापीठाच्या संशोधकांच्या गटाने १९८८ ते २०१९ दरम्यान ५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ४० लाखांपेक्षा अधिक प्रौढांच्या आरोग्यविषयक माहितीची तपासणी या संशोधकांनी केली. पायलोरी संसर्गाची लक्षणे असलेल्या ११ टक्के रुग्णांना अल्झायमर रोगाचा धोका असल्याचे या संशोधनात दिसून आले. हा अभ्यास भविष्यातील संशोधनासाठी मार्ग मोकळा करतो, विशेषतः या जीवाणूचे निर्मूलन केल्याने काही रुग्णांमध्ये अल्झायमर रोग प्रभावीपणे टाळता येईल का याचा शोध घेणे. संशोधकांचे म्हणणे आहे की, अल्झायमर रोगाचे रुग्ण जगभरात वाढत असून लोकसंख्याशास्त्रीय बदलामुळे ही संख्या झपाट्याने वाढण्याची अपेक्षा आहे.

2024 HAPPY NEW YEAR
नववर्षाचा दिवस आला खास
निरोगी आरोग्य हा एकच ध्यास
रोज घ्या २ तन्वीशता टॅब्लेट्स
तेजस्वी त्वचा, दाट केस, शक्तीस्फूर्ती, शांत झोपेसाठी




केमिस्टकडे उपलब्ध
तन्वी हर्बल क्लिनिक - रोज फ्री चेकअप - ठाणे / दादर : 9769695892
FREE CONSULTATION 9820075812

# वांगे शंभरीपार; शाकाहारी खवय्यांची पंचाईत

## बदलत्या वातावरणामुळे फळपिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव, उत्पादनात घट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागताला खवय्यांकडून वेगवेगळ्या तर्रीदार पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी बेत आखण्यात येत आहे. मात्र, शाकाहारींच्या आवडत्या वांग्यांचे दर मागील काही दिवसांपासून शंभर ते सव्वाशे रुपये किलोपर्यंत वाढले आहेत. भरताच्या हिरव्या वांग्यांचे दरही शंभरीपार असून, बाजार समित्यांमधील आवक कमालीची घटली आहे.

सकाळ, दुपार व रात्री अशा तिन्ही प्रहरामध्ये थंडी ते गरमी, असा वातावरण बदल होत असून त्याचा सामना पिकांना करावा लागत आहे. त्यात सकाळच्या प्रहरात धुकेही बराचकाळ लांबत असल्याने फळपिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव, चिकटा रोग पडत आहे. दिवाळीच्या तोंडावर अतिवृष्टीसारखे संकटही कोसळल्याने वांग्याचे पीक उद्ध्वस्त झाले. उर्वरित पिके वाचवण्यासाठी केलेल्या कीटकनाशकांच्या अती माऱ्यानेही जळाले. परिणामी ६० ते ७० टक्के उत्पादन घटले आहे. आवक घटल्याने बाजारात भाव चांगला मिळू लागला.

सध्या वांग्याच्या १५ किलोच्या कॅरेटला एक हजार ते पंधराशे रुपयांपर्यंतचा दर ठोक बाजारात मिळत असल्याचे विहा मांडवा येथील शेतकरी उत्पादक मनोज गोजरे यांनी सांगितले. हिरव्या भरताच्या वांग्याचे उत्पादक कुशल पाटील म्हणाले, नोव्हेंबरपासून १५ जानेवारीपर्यंतच भरताच्या वांग्यांचा हंगाम असतो. जूनमध्ये लागवड केलेली पिके अतिवृष्टीने नष्ट झाली. आता धुक्यामुळे रोग पडतो आहे. लावलेल्या पिकातून केवळ ३० ते ४० टक्केच पीक हाती येत आहे.

जाधववाडी उच्चतम बाजार समितीमध्ये २९ डिसेंबर रोजी केवळ ९ क्विंटल वांग्याची आवक झाली होती. त्याला किमान पाच हजार तर कमाल सहा हजार रुपये दर मिळाला. आवक कमी झाल्याने ग्राहकापर्यंत वांगे शंभर ते सव्वाशे रुपये किलो दराने पोहोचत आहेत.



### वातावरणातील बदल फेब्रुवारीपर्यंत

तीन प्रहरात बदलणारे शुष्क वातावरण हा अलनिनोचा प्रभाव असून फेब्रुवारीपर्यंत ते जाणवणार असल्याचे महात्मा गांधी मिशनच्या एपीजे अब्दुल कलाम विज्ञान व अंतराळ केंद्राचे संचालक श्रीनिवास औंधकर यांनी सांगितले.

### शेवगाही वधारला

सामीष जेवण घेणाऱ्यांसोबत त्याच तोडीची, चवीची भाजी म्हणून शाकाहारीवाले शेवगा हंडी, शेवग्याच्या तर्रीदार भाजीला पसंती देतात. मात्र, सध्या शेवग्याचीही २५ ते ३० रुपये पाव दराने विक्री होत आहे.

# मटण, मासळी, चिकनला उच्चांकी मागणी

## खवय्यांकडून सामिष पदार्थांवर ताव मारून सरत्या वर्षाला निरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** हजारो किलो मटण, मासळी, चिकनवर ताव मारून सामिष खवय्यांनी सरत्या वर्षाला निरोप दिला. मटण, मासळी, चिकन खरेदीसाठी रविवारी सकाळपासून बाजारात गर्दी झाली होती. खवय्यांनी रांगा लावून खरेदी केली.

रविवारी सकाळपासून शहर, तसेच उपनगरांतील बाजारात मासळी, मटण, चिकन खरेदीसाठी सामिष खवय्यांची गर्दी झाली होती. हॉटेल व्यावसायिक, घरगुती ग्राहकांकडून मटण, मासळी, चिकनच्या मागणीत वाढ झाली होती.

गणेश पेठेतील मासळी बाजारात सकाळपासून खवय्यांची गर्दी होती. कसबा पेठेतील मटण मार्केट, लष्कर भागातील श्री छत्रपती शिवाजी मार्केट, कर्वे रस्त्यावरील मटण मार्केट, फर्ग्युसन रस्त्यावरील वीर चापेकर मार्केट परिसरात गर्दी झाली होती तसेच पौड फाटा, विश्रांतवाडी, पद्मावती येथील मासळी बाजारात खरेदीसाठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले.

गणेश पेठेतील मासळी बाजारात खोल समुद्रातील मासळी १५ ते २० टन, आंध्र प्रदेशातून रोहू, कतला, सीलन या मासळीची २० ते २५ टन, नदीतील मासळी ५०० ते ७०० किलो, खाडीतील मासळी ३०० ते ४०० किलो अशी आवक झाली, अशी माहिती गणेश पेठेतील मासळी बाजारातील व्यापारी ठाकूर परदेशी यांनी दिली.

घरगुती ग्राहकांसह हॉटेल व्यावसायिकांकडून मासळीला चांगली मागणी होती. खवय्यांकडून पापलेट, कोळंबी, सुरमई, रावस, हलवा, ओले बोंबिल या मासळीला चांगली मागणी होती. मागणी वाढल्याने दरात ३० ते ३५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे परदेशी यांनी सांगितले.

### मार्गशीर्ष महिना असूनही खरेदीसाठी झुंबड

मार्गशीर्ष महिन्यात मटण, मासळी, चिकनला मागणी नसते. मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवारी श्री महालक्ष्मीचे व्रत केले जाते. त्यामुळे सामिष पदार्थ वर्ज्य केले जातात. नववर्ष स्वागताला मटण, मासळी, चिकनला फारशी मागणी राहणार नाही, अशी शक्यता होती. मात्र, सामिष खवय्यांची रविवारी सकाळपासून मटण, चिकन खरेदीसाठी गर्दी झाली होती. मटणाला चांगली मागणी राहिली. हॉटेल व्यावसायिकांकडून मागणी वाढल्याचे पुणे शहर मटण दुकानदार संघटनेचे प्रभाकर कांबळे यांनी नमूद केले. केटरिंग व्यावसायिक, हॉटेल चालक तसेच घरगुती ग्राहकांकडून चिकनला मागणी होती, असे पुणे, पिंपरी शहर बॉयलर असोसिएशनचे संचालक रुपेश परदेशी यांनी सांगितले.

### मटण, चिकन, मासळीचे किलोचे दर

- मटण- ७४० रुपये
- चिकन- २०० रुपये
- पापलेट- ९०० ते १८०० रुपये
- हलवा- ५५० ते ६५० रुपये
- सुरमई- ५०० ते ७०० रुपये
- रावस- ६०० ते ७५० रुपये
- ओले बोंबिल- १६० ते २६० रुपये
- कोळंबी- २०० ते ८०० रुपये

# नाशिक जिल्ह्यातील वायनरींमध्ये पर्यटनाचा बहर

## वाइनचा खप २० टक्क्यांनी वाढला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** नाताळ सुट्टीत जिल्ह्यातील वायनरींमधील पर्यटनात लक्षणीय वाढ झाली असून वाइनचा खपदेखील २० टक्क्यांनी वाढला आहे. नववर्ष स्वागतासाठी देशभरातून सहकुटुंब दाखल झालेल्या पर्यटकांनी जिल्ह्यातील वायनरी बहरल्या आहेत.

नाशिकमध्ये नववर्षाचे स्वागत वाइनसह करण्यासाठी पर्यटकांची एकच गर्दी उसळली. सुलासारख्या एकेका वायनरींमध्ये दिवसाला अडीच ते तीन हजार पर्यटक हजेरी लावत आहेत.

२०२३ च्या हंगामात देशात सुमारे अडीच कोटी वाइनची निर्मिती झाली. यातील निम्मी म्हणजे सुमारे सव्वा कोटी वाइन एकट्या नाशिकमध्ये तयार झाल्याचे भारतीय वाइन उत्पादक संघटनेने सचिव राजेश जाधव यांनी नमूद केले. संघटनेच्या पाठपुराव्यामुळे अनेक राज्यांनी वाइनसाठी वेगळे धोरण आणले. त्यामुळे मद्य-वाइनमध्ये फरक होऊन वाइनची सहज उपलब्धता वाढली. अनेकांना ती कशी तयार होते, याची उत्सुकता असते. त्यामुळे देशभरातील पर्यटक वर्षभर नाशिकमध्ये येतात.

मुंबईतून नाशिक फारसे दूर नाही. नाताळ, नववर्ष स्वागत अशा विशिष्ट प्रसंगी पर्यटकांची संख्या कमालीची विस्तारते, असे त्यांनी सांगितले.



> सध्या आमच्या वायनरीला दररोज अडीच ते तीन हजार पर्यटक भेट देत आहेत. त्यात सहकुटुंबीयांची संख्या अधिक आहे. वायनरींमध्ये आलेले निम्मे पर्यटक वाइनची चव घेतात. यामध्ये ४० टक्के महिला आहेत. महिलांकडून वाइनला पसंती मिळण्याचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. वाइन सुसंस्कृत सवयीचा भाग बनली असून तिचा खपही वाढत आहे.
>
> – मोनित ढवळे, (वरिष्ठ उपाध्यक्ष, सुला वायनरीज)

# मुंबईत बॉम्बस्फोटाच्या कटाबाबत अफवा

**मुंबई :** शनिवारी रात्री ११२ क्रमांकाच्या मदतवाहिनीवर मुंबईत बॉम्बस्फोट होण्याची शक्यता असल्याचा दूरध्वनी आला. त्यामुळे सर्वच यंत्रणा कामाला लागल्या. अंधेरी पूर्व येथून हा दूरध्वनी आला असून दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीचा पोलीस शोध घेत आहेत. अंधेरी पूर्व जेबी नगर येथून संबंधीत व्यक्तीने दूरध्वनी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांना माहिती देण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. नववर्ष पूर्वसंध्येचा पार्श्वभूमीवर शहरात कडक पोलीस बंदोबस्त आहे.

॥ ३० वा स्मृतिदिन ॥



कै.डॉ. महेश दशरथ पाटील
B.V.Sc. & A.H. (Mumbai)
जन्म : १७ मार्च १९६७
स्वर्गवास : १ जानेवारी १९९४
दशरथ आनंदा पाटील (वडील)
सौ. विजया दशरथ पाटील (आई)
डॉ. सतीश दशरथ पाटील (भाऊ)
डॉ.सौ.सरला सतीश पाटील (वहिनी)
समस्त पाटील परिवार
तिसी, ता. जि. नंदूरबार.

# पतंग उडवताना मुलाचा गच्चीवरून पडून मृत्यू

**वसई:** पतंग उडविताना गच्चीवरून पडून १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. कार्तिक सुभाष रेवाळे (१३) असे या मुलाचे नाव आहे. विरार पूर्वेच्या साईनाथ नगर परिसरात शुक्रवारी सायंकाळी पाचच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

मकरसंक्रात काही दिवसांवर आल्याने पतंग उडविण्यासाठी लहान मुले व तरुणाईने सुरुवात केली आहे. विरार पूर्वेच्या साईनाथ नगर मधील साई वैष्णवी अपार्टमेंट मध्ये राहणारा कार्तिक रेवाळे (१३) हा मुलगा शुक्रवारी संध्याकाळी ५ च्या सुमारास इमारतीच्या गच्चीवर पतंग उडवत होता. त्यावेळी त्याचा तोल जावून तो खाली कोसळला. त्याच्या छाती व पोटाला गंभीर दुखापत झाली. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याचा मृत्यू झाला.

# सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा कमीच

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अमरावती :** यंदा खरीप हंगामात अनियमित पावसामुळे सोयाबीनच्या उत्पादकतेवर परिणाम झाला. उत्पादन कमी झाल्याने बाजारात चांगले दर मिळतील, ही शेतकऱ्यांची अपेक्षा फोल ठरली आहे. सोयाबीनची काढणी होऊन दोन महिने झाले, तरी सोयाबीनचे दर पाच हजारांवर गेले नाही. सध्या शेतकऱ्यांना सोयाबीन हमीभावापेक्षा कमी दरात विकावे लागत आहे.

वर्षअखेरीस शनिवारी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ४०४१ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ४५०० तर कमाल ४६७९ म्हणजे सरासरी ४६४१ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. अकोला बाजार समितीत २५५१ क्विंटल आवक झाली आणि सरासरी ४६३५ रुपये दर मिळाला. सोयाबीनचे हमीभाव ४६०० रुपये प्रति क्विंटल इतके आहेत. गेल्या हंगामात सोयाबीनचे हमीभाव ४३०० रुपये इतके होते.

> शेतमालाचे भाव कमी असण्यामागे केंद्र आणि राज्य सरकारचे चुकीचे धोरण कारणीभूत आहे. केवळ शेतमालाच्या उत्पादन वाढीकडे सरकारचा भर आहे. उत्पादन कमी झाल्यास, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कुठलाही कार्यक्रम नाही. – धनंजय काकडे, अध्यक्ष, शेतकरी-वारकरी, कष्टकरी महासंघ.

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रा विशेष

यात्रासहल

श्रीरामकृष्ण- विशेष- सवलतीत- चारधामयात्रा- केदारबद्री- लाखामंडलसह- ०९-०५-२०२४/ १६-०५-२०२४/ २१-०५-२०२४// शास्त्रोक्त- नर्मदापरिक्रमा- ०९-०१-२०२४/ ०५-०२-२०२४// त्रिस्थळीयात्रा- नैमिष्यारण्यासह-२६-०२-२०२४// केरळ- तामिळनाडू- ०६-०२-२०२४// कुरवपूर- पिठापुर- २५-०१-२०२४// सिक्कीम- दार्जिलींग- भुतान// नैनीताल// हंपी- बदामी- १२-०२-२०२४// काश्मिर- वैष्णोदेवी- अमृतसरसह- २६-०३-२०२४// १९-०४-२०२४// पुर्वांचल// नेपाळ// कर्नाटक- १७-०१-२०२४// बापट- 9137001395/ 8104288074
0070851303-12

दोस्तीटूर *कुरूक्षेत्र-मथुरा- वृंदावन-दिल्ली *काश्मीर- ट्युलिप गार्डन- वैष्णोदेवी- अमृतसरसह *संपुर्ण मध्यप्रदेश *नर्मदापरिक्रमा *सिक्कीम- दार्जिलिंग *कोस्टल कर्नाटका *दुबई *युरोप. 9594880123 / 9702251584
0070839968-19

सर्व्हिसेस

भविष्यविषयक

**मोफत** सल्ला त्वरित समाधान केवळ फोनवर, कारोबार, प्रेमविवाह, प्रेमात दगा, गृहक्लेश, वशीकरण, घटस्फोट, शत्रूनाश, करणीबाधा, लक्ष्मीबंधन अकबरखाँ- 9667680453 कुर्ला, मुंबई.
0070877719-5

औषधोपचार



दूर रविवारी मोफत तपासणी
नसकमजोरी, असमाधानी, शुक्रजंतू कमी वांझपणा असल्यास भेटा !
डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टॅण्डसमोर, हॉटेल मिझाजवळ, औरंगाबाद, फोन नं.(0240)2350042
9021111549
www.drshaikhah.in
0090340194-20-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## OMKARA ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** ९, एम. पी. नगर, फर्स्ट स्ट्रीट, कोंगू नगर एक्स्टेन्शन्स, तिरुपूर-६४१ ६०७.
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (प.), मुंबई-४०० ०२८. संपर्क क्र. : ९७७३४०६१७५.

### स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

[रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा)

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व गहाणकार मेसर्स स्वस्तिक बल्क कॅरिअर्स प्रा. लि. (ऋणको व तारणगहाणकर्ता) १. श्रीमती सीमा ओमप्रकाश परदेशी, २. सुरेशसिंह धनसिंह परदेशी, ३. श्रीमती रंजना सुरेशसिंह परदेशी, ४. श्री. सुरेशसिंह धनसिंह परदेशी, ५. श्रीमती सीमा ओमप्रकाश परदेशी, ६. श्री. ओमप्रकाश धनसिंह परदेशी यांना सूचना देण्यात येते की, याखालील वर्णिलेली जंगम व स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे म्हणजेच ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओएआरपीएल) गहाण आहे/ ताब्यात आहे. याअधिक दिनांकित २८.०१.२०२१ नोंदणीकृत अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा ठाणे जनता सहकारी बँक लि.ने (टीजेएसबी) अंतर्निहित प्रतिभूतींसह उक्त ऋणको, गहाणकार व हमीदारांच्या अनुसार त्यांच्याकडील वित्तीय मत्ता/ संपूर्ण थकीत ऋण आणि ऋणको/ गहाणकार/ हमीदारांकरिता तरतूद केलेल्या पत सुविधेसंबंधित 'ओएआरपीएल'च्या नावे, पीएस १७/२०२०-२१चे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, त्यांचे सर्व हक्क व अधिकार पूर्णतः अभिहस्तांकित व हस्तांतरित केले आहेत. याअधिक ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.च्या (ओएआरपीएल) प्राधिकृत अधिकारींनी २५.०७.२०२३ रोजी सुरक्षित मत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

तदनुसार, ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.ने **('ओएआरपीएल')** ठाणे जनता सहकारी बँक लि.चा, मूळ सुरक्षित धनको, कार्यभार हाती घेतला आहे आणि प्रतिभूतीवरील ताबा आणि देणींच्या वसुलीकरिता हक्कदार बनली आहे. मालमत्तेची विक्री आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित निघालेले/ वसूल न केलेले संविदात्मक दरातील व्याज अधिक **रु. ९६,४८,१००/- (रुपये शहाण्णव लाख अठ्ठेचाळीस हजार शंभर फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता १६.०१.२०२४ रोजी दु. ०१.०० वा. व दु. ०२.०० दरम्यान (बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख व वेळ १५.०१.२०२४ रोजी सायं. ०६.०० वा.पर्यंत आहे) ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर सरफेसी ॲक्टच्या सेक्शन्स १३(२) व (४)च्या तरतुदीअंतर्गत हक्क व अधिकारांच्या अंमलबजावणीत करण्यात येणार आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव आणि ज्ञात भार (जर असल्यास) खालीलप्रमाणे आहेत :

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | इरठे |
|---|---|---|
| मेसर्स स्वस्तिक बल्क कॅरिअर्स प्रा. लि.द्वारा मालकीच्या स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे, बांधकाम होत असलेली प्रीमायसेस धारण केलेला ऑफिस नं. १०२, पहिल्या मजल्यावरील, मोजमापाचे २८.५३ चौ.मी. पूर्वेच्या दिशेने सीमित मोहन नगर, कॉलनी रोड, पश्चिम ओपन स्पेस, दक्षिण ऑफिस नं. १०३, प्लॉट नं. ५ यावर बांधकाम केलेले, मोजमापाचे १४९० चौ.मी., सर्व्हे नं. ५४१/ए/१ + ५४१/ए/४/५ यापैकी, मोजमापाचे १४९० चौ.मी., सीटीएस नं. ३०२ याशी तत्सम, फायनल प्लॉट नं. १९८ व येथे स्थित- नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन नाशिकच्या मर्यादेत. | Rs. 22,10,000/- | Rs. 2,21,000/- |

| | |
|---|---|
| **ई-लिलावाची तारीख** | **१६.०१.२०२४ रोजी दु. ०१.०० वा. ते दु. ०२.००** |
| **किमान बोलीवृद्धी रक्कम** | **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त)** |
| **सहभागाचे बोली पत्र/ केवायसी कागदपत्रे/ इरठेचा पुरावा इ. सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ** | **१५.०१.२०२४ रोजी सायं. ०६.००वा.पर्यंत.** |
| **पाहणीची तारीख** | **१३.०१.२०२४ रोजी दु. ०१.०० व दु. ०४.०० दरम्यान** |
| **ज्ञात दायित्व** | **ज्ञात नाहीत** |

ही प्रसिद्धी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत ऋणको/ गहाणकारांकरिता पंधरा दिवसीय नोटीससुद्धा आहे.

**विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया http://omkaraarc.com/auction.php या सुरक्षित धनकोंच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहा आणि सविस्तर माहितीकरिता प्राधिकृत अधिकारीशी संपर्क साधावा : प्रतिक्षा पटेल (संपर्क क्र. ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्डे- ९३२४५४६६५१) आणि ई-मेल : pratiksha.patel@omkara.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटलासुद्धा भेट देऊ शकतील किंवा सेवा-पुरवठाकार मेसर्स सी-१ इंडिया प्रा. लि., टेलि. हेल्पलाइन : +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पांड्या, मोबाइल : ८८६६६ ८२९३७, ई-मेल : Maharashtra@c1india.com यांच्याशी संपर्क साधू शकतील. स्वारस्य असलेले बोलीदार इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्ट्सी कोड २०१६च्या सेक्शन २९ए अंतर्गत प्रतिज्ञापत्र देतील व अनुपालन करतील.**

स्वाक्षरी/-
**दिनांक : २९.१२.२०२३** प्राधिकृत अधिकारी,
**स्थळ : नाशिक** ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस १७/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)

## OMKARA ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** ९, एम. पी. नगर, फर्स्ट स्ट्रीट, कोंगू नगर एक्स्टेन्शन्स, तिरुपूर-६४१ ६०७.
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर (प.), मुंबई-४०० ०२८. संपर्क क्र. : ९७७३४०६१७५.

### स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

[रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा)

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व गहाणकार १. श्रीमती रंजना सुरेशसिंह परदेशी, २. सुरेशसिंह धनसिंह परदेशी, ३. श्रीमती सीमा ओमप्रकाश परदेशी, ४. श्री. ओमप्रकाश धनसिंह परदेशी यांना सूचना देण्यात येते की, याखालील वर्णिलेली जंगम व स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे म्हणजेच ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.कडे (ओएआरपीएल) गहाण आहे/ ताब्यात आहे. याअधिक दिनांकित २८.०१.२०२१ नोंदणीकृत अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा ठाणे जनता सहकारी बँक लि.ने (टीजेएसबी) अंतर्निहित प्रतिभूतींसह उक्त ऋणको, गहाणकार व हमीदारांच्या अनुसार त्यांच्याकडील वित्तीय मत्ता/ संपूर्ण थकीत ऋणांचे आणि ऋणको/ गहाणकार/ हमीदारांकरिता तरतूद केलेल्या पत सुविधेसंबंधित 'ओएआरपीएल'च्या नावे, पीएस १७/२०२०-२१चे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली, त्यांचे सर्व हक्क व अधिकार पूर्णतः अभिहस्तांकित व हस्तांतरित केले आहेत. याअधिक ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.च्या (ओएआरपीएल) प्राधिकृत अधिकारींनी १८.०४.२०२३ रोजी सुरक्षित मत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

तदनुसार, ('ओएआरपीएल')ने ठाणे जनता सहकारी बँक लि.चा, मूळ सुरक्षित धनको, कार्यभार हाती घेतला आहे आणि प्रतिभूतीवरील ताबा आणि देणींच्या वसुलीकरिता हक्कदार बनली आहे. मालमत्तेची विक्री आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित निघालेले/ वसूल न केलेले संविदात्मक दरातील व्याज अधिक ०१ नोव्हेंबर, २०१५ रोजीप्रमाणे **रु. ३८,८६,६९९/- (रुपये अडतीस लाख शहाऐंशी हजार सहाशे नव्याण्णव फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता १६.०१.२०२४ रोजी दु. ०१.०० वा. व दु. ०३.०० दरम्यान (बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख व वेळ १५.०१.२०२४ रोजी सायं. ०६.०० वा.पर्यंत आहे) ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'', ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही आधाराशिवाय'' या तत्त्वावर सरफेसी ॲक्टच्या सेक्शन्स १३(२) व (४)च्या तरतुदीअंतर्गत हक्क व अधिकारांच्या अंमलबजावणीत करण्यात येणार आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव आणि ज्ञात भार (जर असल्यास) खालीलप्रमाणे आहेत :

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | इरठे |
|---|---|---|
| श्रीमती रंजना सुरेशसिंह परदेशी यांच्या मालकीच्या पुढील स्थावर मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- असलेली रेसिडेन्शियल प्रॉपर्टी येथे स्थित- फ्लॅट नं. ०५, एरिया मोजमापाचा १०७३ चौ.फू. म्हणजेच ९९.७२ चौ.मी. बिल्ट-अप, फ्लॅट नं. ०६, एरिया मोजमापाचा ९८३ चौ.फू. म्हणजेच ९१.३६ चौ.मी. बिल्ट-अप, तिसऱ्या मजल्यावरील आणि कव्हर्ड पार्किंग एरिया २५ चौ.फू. म्हणजेच २.३२ चौ.मी., 'देलिया पार्क' म्हणून ज्ञात असलेली बिल्डिंग, काळे नगर, वीर सावरकर नगर, श्री गुरुजी हॉस्पिटलजवळ, प्लॉट नं. २०, सर्व्हे नं. २५/१/१ए, आनंदवली शिवार, तुकाराम काळे रोड, नाशिक- ४२२ ०१३, महाराष्ट्र. | Rs. 63,00,000/- | Rs. 6,30,000/- |

| | |
|---|---|
| **ई-लिलावाची तारीख** | **१६.०१.२०२४ रोजी दु. ०१.०० वा. ते दु. ०२.००** |
| **किमान बोलीवृद्धी रक्कम** | **रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त)** |
| **सहभागाचे बोली पत्र/ केवायसी कागदपत्रे/ इरठेचा पुरावा इ. सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ** | **१५.०१.२०२४ रोजी सायं. ०६.००वा.पर्यंत.** |
| **पाहणीची तारीख** | **१३.०१.२०२४ रोजी स. ११.०० व दु. ०२.०० दरम्यान** |
| **ज्ञात दायित्व** | **ज्ञात नाहीत** |

ही प्रसिद्धी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत ऋणको/ गहाणकारांकरिता पंधरा दिवसीय नोटीससुद्धा आहे.

**विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया http://omkaraarc.com/auction.php या सुरक्षित धनकोंच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहा आणि सविस्तर माहितीकरिता प्राधिकृत अधिकारीशी संपर्क साधावा : प्रतिक्षा पटेल (संपर्क क्र. ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्डे- ९३२४५४६६५१) आणि ई-मेल : pratiksha.patel@omkara.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटलासुद्धा भेट देऊ शकतील किंवा सेवा-पुरवठाकार मेसर्स सी-१ इंडिया प्रा. लि., टेलि. हेल्पलाइन : +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाइन ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पांड्या, मोबाइल : ८८६६६ ८२९३७, ई-मेल : Maharashtra@c1india.com यांच्याशी संपर्क साधू शकतील. स्वारस्य असलेले बोलीदार इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्ट्सी कोड २०१६च्या सेक्शन २९ए अंतर्गत प्रतिज्ञापत्र देतील व अनुपालन करतील.**

स्वाक्षरी/-
**दिनांक : २९.१२.२०२३** प्राधिकृत अधिकारी,
**स्थळ : नाशिक** ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि.
(ओमकारा पीएस १७/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)

## OMKARA ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** ९, एम.पी. नगर, फर्स्ट स्ट्रिट, कोंगू नगर एक्स्टेंशन्स, तिरुपूर-६४१६०७.
**कॉर्पोरेट कार्यालय :** कोहिनूर स्क्वेअर, ४७वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८. **संपर्क क्र. :** ९७७३४०६१७५.

### स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

[ रुल ९( १ ) यासह वाचलेल्या ८ ( ६ ) च्या तरतुदी पाहा ]

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) च्या तरतुदीसंह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव विक्रि सूचना**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको मेसर्स आडगावकर सराफ प्रायव्हेट लिमिटेड (ऋणको) व राम एस. आडगावकर (सह-ऋणको व गहाणकार) व लव आडगावकर (सह-ऋणको) व कूश आडगावकर (ऋणको) व शाम शशिकांत आडगावकर (सह-ऋणको व गहाणकार) यांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण आहे/ ताब्यात आहे, जिचा ताबा "ओमकारा एआरसी" सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री ०४ जानेवारी, २०२० रोजी प्रमाणे रु. ८,४१,३३,०२५.३०/- (रुपये आठ कोटी एकेचाळीस लाख तेहतीस हजार पंचवीस व पैसे तीस फक्त) अधिक आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित संविदात्मक दरातील निघालेले व्याज/ वसूल न केलेले व्याज या रकमेच्या वसूलीकरिता १६/०१/२०२४ रोजी स. ११.०० वा (बोलीच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ १५/०१/२०२४ रोजी सायं ०६.०० वा पर्यंत आहे) "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

"मेसर्स ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड" वर नमूद केलेले ऋणको व सह-ऋणकोकडील सुरक्षित धनको आहे.

"ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड"ने (ओमकारा पीएस ०४/२०२०-२१ ट्रस्टची विश्वस्थ म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली) "एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"कडील अंतर्निहित सुरक्षेसह दिनांकित १५.०६.२०२० अभिहस्तांकन करारनाम्याद्वारा पूर्वोक्त ऋणको/ हमीदारांच्या अनुसार देय असलेले संपूर्ण थकित ऋण हस्तगत केले आहेत.

स्थावर मालमत्तेचे वर्णन, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव आणि ज्ञात भार (जर असल्यास) खालीलप्रमाणे आहे :

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत | इरठे |
|---|---|---|
| कमर्शियल कॉम्प्लेक्स, "स्टार झोन" म्हणून नाव व स्टाईलमध्ये ज्ञात असलेली, उक्त कॉम्प्लेक्सकडील व त्यापैकी बिल्डिंग ई-१, शॉप प्रीमायसेस धारण केलेला नं. १२, अप्पर ग्राऊंड फ्लोअरवरील, कार्पेट एरिआ मोजमापाचा २०१.६९ चौ.मी. व मेझ्झानाईन फ्लोअर कार्पेट एरिआ मोजमापाचा ८७.३१ चौ.मी. उक्त बिल्डिंगचा एकूण एरिआ मोजमापाचा २८९.०० चौ.मी., पासपोर्ट ऑफिसजवळ, पुणे रोड, देवलाई शिवार, नाशिक रोड, नाशिक - ४२२४०८. | Rs. 5,40,00,000/- | Rs. 54,00,000/- |
| पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - बांधकाम केलेला फ्लॅट ए-१०२, मोजमापाचा १६४५.०० चौ.फू. म्हणजेच १५२.८८ चौ.मी. बिल्ट-अप एरिआ म्हणजेच ११७.५२ चौ.मी. कार्पेट एरिआ समाविष्ट तीन बेड + हॉल + किचन + टॉयलेट, "ए" विंगमधील पहिल्या मजल्यावरील, "प्रियांका ब्लोसोम अपार्टमेंट" मधील व त्यापैकी, जमीन मालमत्तेवर यथोचितरीत्या बांधकाम केलेला. सिरिन मिडोज, गंगापूर रोड लगत, नाशिक. | Rs. 63,00,000/- | Rs. 6,30,000/- |
| पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - बांधकाम केलेला फ्लॅट ए-९०२, मोजमापाचा १६४५.०० चौ.फू. म्हणजेच १५२.८८ चौ.मी. बिल्ट-अप एरिआ म्हणजेच ११७.५२ चौ.मी. कार्पेट एरिआ समाविष्ट तीन बेड + हॉल + किचन + टॉयलेट, "ए" विंगमधील ९व्या मजल्यावरील, "प्रियांका ब्लोसोम अपार्टमेंट" मधील व त्यापैकी, जमीन मालमत्तेवर यथोचितरीत्या बांधकाम केलेला. सिरिन मिडोज, गंगापूर रोड लगत, नाशिक. | Rs. 63,00,000/- | Rs. 6,30,000/- |

| | |
|---|---|
| **ई-लिलावाची तारीख** | **१६.०१.२०२४ रोजी स. ११.०० वा. ते दु. ०२.०० वा.** |
| **किमान बोली वृद्धी रक्कम** | रु. १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) |
| **सहभाग पत्रासह बोली/ केवायसी कागदपत्रे/ इरठेचा पुराव्याच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख व वेळ** | **१५.०१.२०२४ रोजी सायं. ०६.०० वा. पर्यंत** |
| **पाहाणीची तारीख** | **१३.०१.२०२४ रोजी दु.०१.०० व दु.०४.०० दरम्यान** |
| **ज्ञात दायित्वे** | **ज्ञात नाहीत** |

ही प्रसिद्धी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत ऋणको / गहाणकारांकरिता पंधरा दिवसीय नोटीस सुद्धा आहे.

**विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटीकरिता, कृपया http://omkaraarc.com/auction.php या सुरक्षित धनकोंच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहा आणि प्राधिकृत अधिकारीचा संपर्क तपशील- प्रतिक्षा पटेल (संपर्क क्र. : ९७७३४०६१७५ व राजेंद्र देवर्डे - ९३२४५४६६५१ आणि ईमेल : pratiksha.patel@omkararc.com बोलीदार http://www.bankeauction.com या वेबसाइटला सुद्धा भेट देवू शकतील किंवा सेवा-पुरवठाकार "मेसर्स सी-१ इंडिया प्रा. लि.," टेलि. हेल्पलाईन : +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाईन ईमेल आयडी : support@bankeauctions.com, श्री. भाविक पांड्या, मोबा. : ८८६६६८२९३७, ईमेल : Maharashtra@c1india.com यांच्याशी संपर्क साधू शकतील. स्वारस्य असलेले बोलीदार इन्सॉल्व्हंसी अँड बँकरप्ट्सी कोड २०१६च्या सेक्शन २९ए अंतर्गत प्रतिज्ञापत्र देतील आणि त्याचे अनुपालन करतील.**

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी,
दिनांक : २९.१२.२०२३ ओमकारा ॲसेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि.
स्थळ : नाशिक (ओमकारा पीएस ०४/२०२०-२१ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली)